नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २७/१०/२०२४ (रविवार) दुपार

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण २०१२०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक २६/१०/२०२४ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, तुमसर कडुन रामटेक कडे येणारा ट्रक क्र. एम.एच. ४० वाय ९१४९ चा चालक हा ट्रक मध्ये अवैधरित्या विनापरवाना रेती (वाळू) वाहनामध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून महादुला शिवार येथे ट्रक क्र. एम.एच. ४० वाय ९१४९ चा चालक हा समोरून येतांनी दिसला. त्यास थांबण्यास सांगितले असता ट्रक ड्रायव्हर ट्रक सोडुन पसार झाल्याने नमुद घटनास्थळी सदर ट्रक पोस्टेला आणुन डिटेन करून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. ट्रक मधील ०४ ब्रास रेती किंमती १२०००/—रू. व ट्रक क्र. एम. एच. ४० वाय ९१४९ किंमती २०,००,०००/—रू. असा एकुण २०१२०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून ट्रक क्र. एम.एच. ४० वाय ९१४९ चा चालक मालक यांचेविरुद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२), ४९,बि.एन.एस. सहकलम ४८(७)(८), महा. जमीन. मह. अधि. सहकलम ४,२१ खान खनिज विकास अधिनियम, ३ सार्वजनिक संपत्ती अधिनिय अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. फरार आरोपीचा शोध रामटेक पोलीस घेत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनात पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोनि आसाराम शेटे व पोहवा निलेश गावंडे, पोशि ओमकार तिरपुडे यांनी केली.

## पोस्टे बुट्टीबोरी हद्दीतील असोला गवळी टोला पारधी बेडा परिसरात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

आगामी विधानसभा निवडणुक या अनुषंगाने कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. २६/१०/२०२४ रोजी पोस्टे बुट्टीबोरी हद्दीतील असोला गवळी टोला पारधी बेडा परिसरात मोहाफुल गावठी दारू काढणारे इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे–** देवा कन्हया चव्हाण वय ४५ वर्ष,रा.खापरी ता उमरेड जि. नागपुर हा मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिग भट्टी काढतांना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून १) दोन प्लॅस्टिक डबकी मध्ये ४० लिटर मोहफुल गावठी दारू किंमती ४०००/–रु २) ९ लोखंडी ड्रम मोहफुल रसायन सडवा एकूण १८०० लिटर प्रत्येकी ३५/–रू लिटर प्रमाणे – एकूण किंमती ६३०००/– रु

३) भट्टी काढण्याचे साहित्य किंमती ३०००/–रु ४) जळवु लाकुड २ टन अंदाजे कि. ५०००/–रू ५) २ प्लॅस्टीक डबकी कि. ४००/–रू. ६) ११ ड्रम किं १०००/–रू. प्रमाने एकुण ११०००/–रू. असा एकूण ८६,४००/– रु चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल नाश करून सॅम्पल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे बुटीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले. त्याचे विरुद्ध कलम ६५ ( फ, क, ब, ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष ए पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनी सागर गोमासे, सफौ मिलिंद नांदुरकर, पोहवा विष्णु जायभाये, पोकॉ मनिष नेवारे, चापोकॉ वसंत राठोड यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर